दाखल तारीख :— २/५/२०१२
नोंदविला तारीख:— २/५/२०१२
निकाल तारीख :— १८/०२/२०१४
कालावधी:—वर्षे १महिने ९ दिवस१५

दापोली येथिल मा. न्यायदंडाधिकारी वर्ग—१ यांचे न्यायालयात
मुक्काम दापोली जिल्हा रत्नागिरी
( वि.श.देशमुख यांचेसमोर )

निशाणी कमांक २७

फौजदारी नियमीत खटला कमांक ४२ सन २०१२.

महाराष्ट्र शासन
(सरकारतर्फे फिर्यादी प्रविण देवजी अबगुल
वय २२ वर्षे, रा. साकुर्डे अबगुलवाडी,
तालुका दापोली, जिल्हा रत्नागिरी ) . . फिर्यादी

विरुध्द

रामचंद्र गोविंद अबगुल,
वय ३२ वर्षे, रा. साकुर्डे अबगुलवाडी
तालुका दापोली जिल्हा रत्नागिरी. . . आरोपी

अपराध:—भारतीय दंडविधान कलम ३२६, ३२३, ५०४, ५०६ अन्वये.

सरकारतर्फे सहा. सरकारी वकील श्री. जाधव.
आरोपीतर्फे वकील श्री. एस.एस.कदम.

—: न्या य नि र्ण य :—
( निकाल घोषित दि. १८/२/२०१४ )

१. प्रस्तुतचा खटला आरोपीविरुध्द भारतीय दंडविधान कलम ३२६, ३२३, ५०४, ५०६ अन्वये दाखल आहे.

२. सरकारतर्फे खटल्याची हकीकत थोडक्यात अशी की:—

फिर्यादी व आरोपी हे एकाच गावात एका वाडीत

रहाणारे असुन एकमेकांचे नातेवाईक आहेत. फिर्यादी कुडावळे येथे नोकरीस आहे. दिनांक १/२/२०१२ रोजी फिर्यादी कामावरुन घरी आला व त्यानंतर मंदीरात आरतीसाठी गेला. त्यानंतर अंकुश सिताराम अबगुल यांचे घरी गेला. त्यानंतर जेवणासाठी फिर्यादीचे चुलते जयराम दौलत अबगुल यांचे घरी गेला. त्यांचेजवळ बोलत असताना रात्रौ ९.१५ वाजताचे सुमारास फिर्यादीचे चुलते जयराम दौलत अबगुल यांच्या घराला लागुनच असलेले रामचंद्र गोविंद अबगुल हा तेथे आला व त्यांनी फिर्यादीस उद्देशून '' तु दारु पितोस, आज सुध्दा दारु पिवून आलास, थांब तुझे नाव मी एकनाथ मोरेना सांगतो.' असे म्हणून बडबडू लागला व घराबाहेर जावून शिवीगाळी करु लागला. फिर्यादी त्यांचे चुलत्यांचे घरातून बाहेर पडल्यावर आरोपीने फिर्यादीचा हात ओढत आपल्या घराजवळ घेवून गेला व तेथे मारण्यास सुरुवात केली व कोयतीने फिर्यादीचे डोक्यावर फटका मारला. त्यामुळे डोक्यातून रक्त येवू लागला. फिर्यादी जोरजोरात ओरडू लागला त्यामुळे त्या ठिकाणी शेजारील लोक जमा झाले व त्यांनी फिर्यादीस दापोली येथे दवाखान्यात आणले व औषधोपचार सुरु केले व त्यानंतर फिर्यादीने आरोपी विरुध्द दापोली पोलीस ठाण्यात तकार दाखल केली.

३. सदरची तकार दापोली पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर १४/२०१२ भारतीय दंडविधान कलम ३२६, ३२३, ५०४, ५०६ अन्वये घेण्यात आली. तपासी अंमलदार गणेश गंगाराम सावर्डेकर, पोलीस हेड कॉन्स्टेबल बक्कल नंबर ४७ दापोली पोलीस ठाणे यांनी पुढील तपासकाम करुन आरोपींविरुध्द दोषारोपपत्र सादर केले.

४. आरोपी न्यायालयात हजर झालेनंतर त्यांचेवर निशाणी क्रमांक १६ येथे भारतीय दंडविधान कलम ३२६, ३२३, ५०४, ५०६ अन्वये दोषारोप ठेवणेत आला. आरोपीस दोषारोप मराठीतून वाचून दाखविणेत आला. आरोपीने गुन्हा नाकबुल करुन खटला चालविण्याची मागणी केली. त्याप्रमाणे त्याचे निवेदन निशाणी १७ येथे नोंदविणेत आलेले आहे.

५. याकामी खालील मुद्दे चर्चेसाठी उपस्थित होतात. त्यावरील माझे निष्कर्ष मी त्यापुढे खालील थोडक्यात नमुद कारणांसाठी नोंदवित आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | सरकारपक्षाने असे शाबीत केले आहे काय की, तारीख १/२/२०१२ रोजी रात्रौ ९.१५ वाजता साकुर्डे अबगुलवाडी ता—दापोली येथे आरोपीने फिर्यादी यास कोयतीचा फटका त्याच्या डोक्यावर मारुन गंभिर दुखापत केली व त्याद्वारे भारतीय दंडविधान कलम ३२६ अन्वये अपराध केला ? | नकारार्थी |
| २ | सरकारपक्षाने असे शाबीत केले आहे काय की, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपी याने फिर्यादी यास हाताचे ठोशाने व थापटाने मारहाण केली व दुखापत केली व त्याद्वारे आरोपीने भारतीय दंडविधान कलम ३२३ अन्वये अपराध केला ? | नकारार्थी |
| ३ | सरकारपक्षाने असे शाबीत केले आहे काय की, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपी याने फिर्यादी यास शिवीगाळी केली व त्याचे हातून शांतताभंग होईल असे कृत्य केले व त्याद्वारे भारतीय दंडविधान कलम ५०४ अन्वये अपराध केला ? | नकारार्थी |
| ४ | सरकारपक्षाने असे शाबीत केले आहे काय की, वरील तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपी याने फिर्यादी यास मारणेची धमकी दिली व धाकदपटशा दाखविला व त्याद्वारे आरोपीने भारतीय दंडविधान कलम ५०६ अन्वये अपरध केला ? | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| ५ | आदेश काय ? | अंतिम आदेशान्वये |

<u>का र ण मि मां सा</u>

६. या प्रकरणामध्ये आरोप सिध्दतेसाठी सरकार पक्षाने फिर्यादी प्रविण देवजी अबगुल (स.सा.क. १) यास निशाणी २३ अन्वये, जयराम दौलत अबगुल (स.सा.क. २) यास निशाणी २४ अन्वये तपासण्यात आले आहे. आरोपीविरुध्द कोणताही गुन्हादर्शक पुरावा न आल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ नुसार निवेदन घेण्यात आलेले नाही.

७. सरकारपक्षातर्फे सरकारी वकील व आरोपीतर्फे वकील श्री. कदम एस.एस. यांचा युक्तीवाद ऐकला.

८. <u>मुद्दा क्रमांक १ ते ४ करीता</u> :—

प्रविण देवजी अबगुल (साक्षीदार क्रमांक १) हा फिर्यादी आहे. त्याने आरोपी रामचंद्र अबगुल हा त्याचा भाउ आहे. घटना कधी व काय घडली ते आठवत नाही असे सांगितले. फिर्यादीवर त्याची सही आहे असे पुराव्यात सांगितले आहे. फिर्यादीवर त्याची सही आहे. परंतु फिर्यादीने त्या तक्रारीमधील मजकूर माहीत नसल्याचे सांगितले आहे. त्यामुळे सरकारपक्षाने त्याला फितूर घोषित करुन त्याचा उलटतपास घेतला. तथापी सदर साक्षीदाराने आरोपीने त्याच्या डोकीत लोखंडी कोयती मारुन त्याला जखमी केल्याचे सपशेल नाकारले आहे. अनंत अबगुल, बाळाराम खामकर यांनी फिर्यादीस उपचारासाठी दवाखान्यात नेले किंवा कसे हे त्याला माहित

नसल्याचे सांगितले आहे. जयराम दौलत अबगुल (साक्षीदार कमांक २) याने त्याचे पुराव्यात दिनांक २/२/२०१२ रोजी पोलीसांनी त्याला रामचंद्र अबगुल यांचे घराजवळ पंचनामा करणेसाठी बोलाविले नव्हते असे सांगितले. दोन्ही पंचनाम्यावर त्यांची सही आहे परंतु त्यातील मजकूर त्याला माहीत नाही असे सांगितले आहे. सदर पंच साक्षीदारांना सरकारी वकीलांनी फितूर घोषित करुन त्यांचा प्रदिर्घ उलटतपास घेतला. परंतु पोलीसांनी त्यांचेसमक्ष पंचनामे केले ही बाब त्यांनी नाकारली आहे. त्यामुळे पोलीसांनी पंचासमक्ष दोन्ही पंचनामे केले ही बाब शाबीत झालेली नाही. त्यामुळे घटनास्थळाचा पंचनामा केला व आरोपीकडून गुन्हयातील जप्त मुद्देमाल कोयती पंचासमक्ष जप्त केली ही बाब शाबीत होण्याइतपत विश्वासार्ह पुरावा या न्यायालयासमोर आलेला नाही. त्याचप्रमाणे फिर्यादी देखिल फितूर झालेला आहे. त्यामुळे फिर्यादही शाबीत झालेली नाही. सबब आरोपीने फिर्यादीस कोयतीने त्याचे डोक्यावर फटका मारुन गंभिर दुखापत केली, त्याला लाथाबुक्क्याने मारहाण केली, शिवीगाळी केली व मारण्याची धमकी दिली ही बाब पुरेशा पुराव्याअभावी नि:संशयपणे शाबीत झालेली नाही.

९. अशाप्रकारे आरोपी विरुध्दचे भारतीय दंडविधान कलम ३२६, ३२३, ५०४, ५०६ खालील तकार शाबीत होण्याइतपत विश्वासार्ह पुरावा कोर्टासमोर आलेला नाही. सबब सबळ पुराव्याअभावी मुद्दा कमांक १ ते ४ चे उत्तर नकारार्थी देण्यात येते व मुद्दा कमाक ५ चे उत्तरार्थ खालील आदेश पारीत करणेत येत आहे.

# आ दे श

१. आरोपी रामचंद्र गोविंद अबगुल राहणार साकुर्डे तालुका दापोली यास फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८—१ अन्वये भारतीय दंडविधान कलम ३२६, ३२३, ५०४, ५०६ चे आरोपातून दोषमुक्त करणेत येत आहे.

२. आरोपीचा जामीनकदबा व बंधपत्र रद्द करणेत येत आहे.

३. जप्त मुद्देमाल अनुक्रम नंबर १ लोखंडी कोयती ही अपील मुदतीनंतर लिलाव करणेत यावी व लिलावाची रक्कम सरकारजमा करणेत यावी. उर्वरीत मुद्देमाल अनुक्रम नंबर २ ते ४ हे किंमतहीन असल्याने अपील मुदतीनंतर नाश करणेत यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

दिनांक :— १८/०२/२०१४.
ठिकाण :— दापोली

( वि.श.देशमुख )
न्यायदंडाधिकारी वर्ग—१,
दापोली.